महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १५९ वा | दिनांक : २२/०३/२०२५ | वार : शनिवार

## देवेंद्र फडणवीस अबू आझमींचे साटेलोट : इम्तियाज जलील यांचा आरोप



**छत्रपती संभाजीनगर :** सप आमदार अबू आझमी यांनी भाजपच्याच सूचनेनुसार मुघल बादशहा औरंगजेबाचे उदात्तीकरण करण्याचे विधान केल्याचा दावा एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अबू आझमी यांनी राज्यात काही ठिकाणी उमेदवार उभे केल्याचेही ते यावेळी म्हणालेत. त्यांच्या या दाव्यांमुळे राज्याचे राजकारण अधिकच तापण्याची शक्यता आहे.

इम्तियाज जलील यांनी शुक्रवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यात त्यांनी वरील आरोप केला. ते म्हणाले, अबू आझमी यांची उत्तर प्रदेशात खूप संपत्ती आहे. त्यांची काही कनेक्शन आहेत. त्यामुळेच त्यांनी या निवडणुकीत भाजपला पाठिंबा दिला. माझ्या मते या प्रकरणी सर्वकाही मॅनेज होते. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार राज्यात काही ठिकाणी उमेदवार उभे केले. त्यांनी माझ्याविरोधातही उमेदवार दिला. त्या उमेदवाराने ५ हजार मते घेतली. माझा २ हजार मतांनी पराभव झाला. म्हणजे एका अर्थाने ते उघडपणे भाजपला पाठिंबा देत आहेत.

विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अबू आझमी औरंगजेबाची उदात्तीकरण करणारे विधान करतात. तो खूप महान होता असे ते म्हणतात. हे बोलण्याची काय गरज होती. हे ते स्वतः म्हणाले नाहीत. त्यांना भाजपने असे बोलण्यास भाग पाडले. मी हे खूप जबाबदारीने सांगत आहे. भाजपने त्यांना असे बोलण्यास भाग पाडले. तू पहिल्या दिवशी ये, आम्हला लोकं खूप प्रश्न विचारतील की, संतोष देशमुखांची हत्या कशी झाली? क्राईम रेट काय झाला आहे? या प्रश्नांची उत्तरे देणे आम्हाला अवघड जाईल. त्यामुळे तुम्ही आम्हाला मदत करा. त्यानंतर आलले सगळेच्या सगळे हिंदू खतरे में है म्हणत.

या लोकांनी ४०० वर्षांपूर्वी मेलेल्या औरंगजेबाला पुन्हा जीवंत केले. मागच्या ७० वर्षांत औरंगजेबाविषयी जेवढे वाचले गेले नसेल तेवढे लोकांनी मागच्या काही दिवसांत वाचले आहे. तुम्ही त्यांना जीवंत केले. मग मी पाण्याचा प्रश्न विचारणार नाही. माझ्या शहरात आजही ८ दिवसाला पाणी येते. याविषयी कुणी अवाक्षरही काढणार नाही. अनेक शहरांत औरंगजेबाचे फोटो जाळण्यात आले. पुण्यात पतीतपावन संघटनेने औरंगजेबाऐवजी बहादूरशहा जफरचा फोटो जाळला. बहुतेक एक दिवस ते माझाही फोटो जाळतील. कारण मी सुद्धा त्याच्यासारखाच दिसतो, असे इम्तियाज जलील मिश्किलपणे बोलताना म्हणाले.

## सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू हा संस्थात्मक मर्डर : जितेंद्र आव्हाड



**मुंबई :** परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू हा संस्थात्मक मर्डर होता. मी सोमनाथला परत आणू शकत नाही. तशी ताकद मला भगवंताने दिली नाही. पण त्याला न्याय मिळवून देण्यासाठी मी जीवाची बाजी लावेल असा शब्द मी त्याच्या आईला देतो, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्याची भावना व्यक्त केली आहे.

परभणी शहरात काही महिन्यांपूर्वी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापुढील संविधानाची विटंबना करण्यात आली होती. या घटनेचे शहरात तीव्र पडसाद उमटले होते. आंदोलकांनी वाहनांची प्रचंड तोडफोड केली होती. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये अनेकांना अटक करण्यात आली होती. त्यात ३५ वर्षीय सोमनाथ सूर्यवंशी यांचाही समावेश होता. पण त्यानंतर त्यांचा कोठडीतच संशयास्पद मृत्यू झाला. आता या प्रकरणाचा न्यायदंडाधिकाऱ्यांचा रिपोर्ट समोर आला आहे. त्यात सोमनाथ यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीतच झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जितेंद्र आव्हाड यांनी उपरोक्त भावना व्यक्त केली आहे.

जितेंद्र आव्हाड यासंबंधीच्या आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, "परभणी... एक होतकरू आणि तरुण मुलगा परिस्थितीशी झगडत कायद्याचे शिक्षण घेत पीडितांना न्याय मिळवून देण्याचे स्वप्न पाहत असतो. त्याला अन्याय सहन होत नसतो त्याविरोधात उद्रेकात तो शामिल होतो. पोलीस अटक करतात आणि न्यायालयात हजर करतात. न्यायालयीन कोठडी मिळते आणि त्याच दिवशी त्याच्या तुरुंगात मृत्यू होतो. तो तरुण म्हणजे सोमनाथ सूर्यवंशी."

"सरकार छाती ठोकपणे म्हणते मृत्यू मल्टिपल शॉकमुळे झाला. मला आधीपासून ह्यात संशय होता हे जवळपास अशक्य होते. पोस्टमार्टममध्ये सर्व क्लिअर होते तरीही सरकार ऐकत नव्हते. कुणाला तरी वाचवत होते. आज दंडाधिकारी अहवालात हे स्पष्ट झाले की हा मृत्यू नव्हता तर हत्या होती क्रूर हत्या."

"त्यांनी तैनात पोलिसांना दोष दिला आहे. एक इन्स्टिट्यूशनल मर्डर. मी मनापासून सलाम करतो सोमनाथच्या आईला, जिने स्वाभिमानाने तुटपुंजी मदत नाकारली. तिने स्पष्टपणे सांगितले, मला माझा सोमनाथ हवा. मी दुःखद अंतःकरणाने सांगतोय सोमनाथ तर मी आणू शकत नाही. ती ताकद भगवंताने मला दिली नाही पण त्याला न्याय मिळवून देण्यासाठी जीवाची बाजी लावेल हा जितेंद्र आव्हाडचा आईला शब्द आहे."

## आचार्य १०८ श्री विशुद्ध सागर जी महाराज यांचा प्रवचन सोहळा गुरु मिश्री मेडिकल कॉलेजच्या प्रांगणात संपन्न



**बदनापूर :** ओम शांती बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या गुरु मिश्री कॅम्पस शेलगाव ता. बदनापूर येथे हे महातपस्वी चर्या शिरोमणी आचार्य १०८ श्री विशुद्ध सागरजी महाराज यांचा प्रवचन सोहळा मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.कॉलेजच्या प्रांगणात शिरोमणी आचार्य १०८ विशुद्ध सागरजी महाराज यांचे त्यांच्या संघा सह सकाळी आगमन झाले, यानंतर झालेल्या प्रवचनात श्री विशुद्ध सागरजी महाराज यांनी संबोधित करताना सांगितले की , सर्वांनी मोठ्यांचा आदर करावा, आपण समाजामध्ये वावरत असताना सर्व वडीलधाऱ्या माणसांसोबत आदरपूर्वक वागून त्यांचा सन्मान वाढवावा कुठल्याही प्रकारची हिंसा परमेश्वराला मान्य नाही.

आज जगामध्ये बहुतेक देशांमध्ये युद्ध सदृश्य परिस्थिती आहे अशा परिस्थितीत आपला भारत देश हा भगवान महावीरांनी जो अहिंसेचा संदेश दिला त्याच संदेशाचे अनुकरण करत आहे आणि जगाला शांती व अहिंसेचा मार्ग अवलंब करण्याचा आग्रह धरत आहे. आपले शब्द हे खूप मौल्यवान आहेत त्याचबरोबर ते शस्त्रासारखे शक्तिशाली आहेत आपण सर्वांनी इतरांशी बोलताना आपल्या शब्दांनी त्यांच्यावर आघात होणार नाही अशी प्रत्येकाने काळजी घेणे गरजेचे आहे.

आपण कुठल्याही व्यवसायात असलो तरी गरजू व्यक्ती आपल्याकडे मदत मागण्यास आला असता आपल्या आर्थिक फायद्याचा विचार न करता मानवतेच्या आधारावर त्याला मदत करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे असे सांगून श्री विशुद्ध सागर जी महाराज यांनी आपल्या जीवनामध्ये शारीरिक आजारांपेक्षा मानसिक आजाराच्या समस्या अधिक आहेत कारण माणसाच्या दैनंदिन जीवनात उद्भवणारी चिंता आहे.

आज शाळेत जाणाऱ्या लहान मुलांपासून प्रत्येकाला काही ना काही चिंता आहे त्यावर एकच उपाय प्रसन्न राहा, चिंता सोडा. यावेळी अध्यात्मयोगी श्री विशुद्ध सागरजी महाराज लिखित "चिंता रहस्य" या मार्गदर्शक पुस्तकाचे सर्व भक्तगण आणि विद्यार्थ्यांमध्ये वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जितेंद्र कासलीवाल यांनी केले तर आभार प्रदर्शन करतांना संस्थेच्या अध्यक्षा डॉ. कंचन देसरडा मॅडम यांनी संस्थेच्या गुरु मिश्री होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, गुरु मिश्री आयुर्वेदिक कॉलेज, गुरु मिश्री कॉलेज ऑफ फार्मसी तसेच देसरडा पब्लिक स्कूल यांच्या शैक्षणिक उपक्रमाबद्दल माहिती दिली आणि भावपूर्ण अध्यात्मयोगी १०८ श्री विशुद्ध सागरजी महाराज यांचे आभार मानले. याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. योगेश देसरडा, प्राचार्य डॉ.बी. एल. दुधमल ,प्राचार्य व्हि. व्हि. दसरे, उपप्राचार्य डॉ.जे.सी. दरख, प्रा.डॉ. निर्मला मुथा इतर प्राध्यापक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच मान्यवर भक्तजन उपस्थित होते

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ मार्च २०२५


## दानकुँवर महिला महाविद्यालय आणि जेईएस महाविद्यालयात शैक्षणिक सामंजस्य करार

**जालना** : नवीन शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कौशल्य आधारित व क्षेत्रभेटी अभ्यासक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या वतीने करण्यात येत आहे.

त्यासाठी एकाच महाविद्यालयातील भौतिक व शैक्षणिक सुविधांवर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांच्या ज्ञान कक्षा अधिक विस्ताराव्या म्हणून येथील श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयाच्या मराठी भाषा व वाङ्मय विभागाने शहरातील जेईएस महाविद्यालयाच्या मराठी विभागाशी शैक्षणिक सहकार्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या सामंजस्य करारामुळे फॅकल्टी एक्स्चेंजद्वारे विद्यार्थ्यांना एखाद्या विषयावर अधिक खोलवर शिकण्याची व अभ्यास करण्याची सोय उपलब्ध होणार आहे. तसेच यामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळांचे आयोजन करणे सोपे होणार आहे. तसेच संयुक्त विद्यमाने मोठ्या स्तरावर शहरवासीयांसाठी खुल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करता येईल.

महाविद्यालयात शिकणारा विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व सामाजिक दृष्टिकोनातून मोठे रचनात्मक कार्य ही हाती घेता येईल. असे मराठी भाषा व वाङ्मय विभागाचे प्रमुख डॉ. वासुदेव उगले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे.

## हुकूमशाहीचा जाहीरनामा असणारे महाराष्ट्र जनसूरक्षा विधेयक मागे घ्या



**छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाला जिल्हाधिका-यांना भारतीय पिछडा शोषित संघटनेच्या निवेदन देण्यात आले. बीपीएसएस दिलेले निवेदनात म्हटले आहे की, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३, ज्याअंतर्गत व्यक्ती व संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला जात आहे, हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे आणि भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे.हे विधेयक अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट व्याख्या वापरून व्यक्ती व संघटनांवर कठोर निर्बंध लावण्याचा प्रयत्न करत असून, त्याचा गैरवापर राजकीय, सामाजिक आणि विचारसरणीच्या आधारे दडपशाही करण्यासाठी केला जाऊ शकतो.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कोणत्याही लोकशाही देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असून, त्यावर कोणत्याही प्रकारची बंधने लादणे हा लोकशाही मूल्यांचा आणि नागरिकांच्या हक्कांचा अवमान आहे.या विधेयकामुळे काय गंभीर परिणाम होऊ शकतात ते निवेदनात पुढीलप्रमाणे सांगण्यात आले आहे : - नागरिकांना त्यांचे मत मांडण्यास किंवा सरकारच्या धोरणांवर टीका करण्यास अडथळा निर्माण होईल, जो संविधानाने दिलेल्या हक्कांच्या विरोधात आहे.स्वतंत्र पत्रकार, मीडिया संस्था आणि सोशल मीडियावरील विचारप्रवर्तक यांना या विधेयकाचा गैरवापर करून लक्ष्य केले जाऊ शकते.

सामाजिक संघटना व एनजीओ यांच्या वैध आंदोलनांवर निर्बंध येऊन जनतेच्या न्याय मागण्यांवर अन्यायकारक मर्यादा येऊ शकतात. विवक्षित बेकायदेशीर कृत्ये" ही संकल्पना नीट स्पष्ट न करता दिल्यामुळे प्रशासन आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना अवास्तव अधिकार मिळतील, ज्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य आणि मूलभूत अधिकार धोक्यात येतील. या विधेयकामुळे लोकशाही मूल्यांवर परिणाम होईल आणि नागरिकांचा सरकारवर प्रश्न विचारण्याचा हक्क मर्यादित केला जाईल.हे विधेयक पूर्णतः रद्द करण्यात यावे. या विधेयकाबाबत व्यापक जनसुनावणी घ्यावी आणि नागरी समाज, तज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांचे मत विचारात घ्यावे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, माध्यम स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याच्या दृष्टीने नवीन कायद्यांचे मसुदे तयार करताना संविधानिक तज्ज्ञांची मदत घ्यावी. इत्यादी मागण्या केल्या आहेत.

या विधेयकामुळे महाराष्ट्रातील नागरी हक्क, लोकशाही मूल्ये आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर परिणाम होईल. त्यामुळे आम्ही महाराष्ट्र सरकारला आणि विधानमंडळ समितीला आग्रहपूर्वक विनंती करतो की, हे विधेयक रद्द करण्यात यावे. भारतीय पिछडा ओबीसी शोषित संघटनेचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष सुदाम चिंचाणे, मराठवाडा अध्यक्ष डॉ कालिदास भांगे, डॉ हनुमान वांकर, जनार्दन कापुरे, प्रभाकर गायकवाड इत्यादींची उपस्थिती होती.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हुन अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com


## अग्निवीर कॅडेट प्रशांत नागदेचा सत्कार



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : उमरगा येथील श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आज दि.२१ मार्च २०२५ रोजी महाविद्यालयाच्या वतीने सत्कार, करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ संजय अस्वले होते कॅडेट प्रशांत राम नागदे चा भारतीय सैन्यदलात मद्रास रेजिमेंट मध्ये अग्निवीर म्हणुन भरती झाल्या बदल अभिनंदन व सत्कार करण्यात आला. त्याचे मुळ गाव घोटाळा ता. बस्वकल्याण कर्नाटक वडिल शेतकरी अत्यंत गरिब, हालाकिच्या परिस्थितुन प्रशांतला शिक्षण दिले. व महाविद्यालयाच्या एनसीसी विभागात प्रवेश घेण्यास सांगितले त्याने या संधीचे सोन केल.

प्रशांतने गुलबर्गा मॅरेथॉन स्पर्धेत द्वितीय पुरस्कार प्राप्त केला . शाळा ,महाविद्यालयात सुद्धा त्याने मैदानी धावणे स्पर्धेत . विभागीय, राज्यस्तरीय स्पर्धे पर्यंत यश संपादन केले. स्वतःच्या स्वबळावर जिद्द, मेहनत, कठिण परिश्रम, आत्मविश्वासाच्या बळावर त्यांने हे यश संपादन केले. त्याबदल प्राचार्य अस्वले यांनी त्याच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कॅडेटसनी प्रशांतचा आदर्श समोर ठेऊन आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास साधावा, वेगवेगळ्या पदावर जाऊन आपले नावलौकिक सिद्ध करून दाखवावे असे यावेळी त्यांनी प्रतिपादन केले.

यावेळी डॉ.पद्माकर पिटले , गुंडाजीबापू मोरे ,नितीन कोराळे , विशाल कानेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ गिरीधर सोमवंशी यांनी तर आभार कॅडेट ओमकार वाघमोडे यांनी मानले. या कार्यक्रमाला प्राध्यापक, प्राध्यापिका एनसीसी कॅडेट व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिखली नगरीतील "चैत्र पाडवा पहाट"



**चिखली (महेश मुंढे)** : दरवर्षीप्रमाणे चिखलीतील प्रभात संस्कृती सोहळा चैत्र पाडवा पहाट चे आयोजन रविवार दिनांक ३० मार्च रोजी आयोजित करण्यात आला आहे. या प्रभात सांस्कृतिक सोहळ्याचे हे १९ वे वर्ष. गेली अठरा वर्षे महाराष्ट्रातील नामवंत कलाकारांच्या गायकीचा आस्वाद चिखलीकर रसिक या सोहळयाच्या माध्यमातून घेत आला आहे. सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

चिखली नगरीतील विवेकानंद शिकवणी मधील माजी विद्यार्थी वर्गाच्या सहभागातून हा सोहळा निः शुल्क आणि निःस्वार्थ भावनेने आजही सुरु आहे.

शहरातील विवेकानंद क्लासेसचे संचालक श्री इरतकर सर आणि त्यांनी घडविलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या सहभागातून २००७ पासून या प्रभात संगीत सोहळ्याची सुरुवात झाली. झी मराठीची वैशाली म्हैसने-माडे, गौरव महाराष्ट्राची विजेती धनश्री देशपांडे, भजन सम्राट बाळासाहेब वाईकर, पंडीत भिमसेन जोशींचे शिष्य पं. संजय गरुड इ. अनेक कलावंतांनी चिखलीकर रसिकांना मंत्रमुग्ध केलेले आहे.

रविवार दि. ३० मार्च २०२५ च्या गुढीपाडव्याला पहाटे ४.३० वाजता यवतमाळ येथील श्री पुर्णाजी खानोदे आणि संच या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. श्री पुर्णाजी खानोदे यांची सुकन्या कु. भाग्यश्री खानोदे (झी-मराठी, अवघा रंग एक झाला फेम) हिचे देखील सुश्राव्य गायन रसिकांना ऐकायला मिळणार आहे. सौ. मनिषा वानखडे व युवा गायक ऋषभ हटकर यांची गायकी श्री पुर्णाजीच्या गायकी सोबत रसिकांना श्रवण करावयास मिळेल.

तबला अभिषेक लोखंडे, बासरी-राम लाहूळकार, किबोर्ड सुनील येडसकर, आक्टोपॅड- ज्ञानेश्वर धनभर आणि या कार्यक्रमाचे प्रभावी सुत्र संचलन प्रा. सौ. नीता भालेराव करणार आहेत. चिखली येथील एस.पी. एम. महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात गुढीपाडव्याच्या दिवशी पहाटे ४.30 वाजता होऊ घातलेल्या या कार्यक्रमास रसिकांनी अलोट गर्दी करावी, असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ मार्च २०२५


## रस्त्याच्या मधोमध खांब, महावितरण मात्र बिल वसुलीमध्ये व्यस्त!



**भंडारा (एम. वी. बनसोड):** मागील एका महिन्यापासून नागपूर नाका ते राजीव गांधी चौक दरम्यानच्या रस्त्यावर महावितरणचे तब्बल ७ ते ८ विजेचे खांब रस्त्याच्या मधोमध गाळलेले आहेत. विशेष म्हणजे, या धोकादायक परिस्थितीपासून अवघ्या २०० मीटर अंतरावर महावितरणचे भंडारा मुख्य कार्यालय असताना देखील महावितरण याकडे पूर्णतः दुर्लक्ष करत आहे.संबंधित रस्त्यावर १० पेक्षा जास्त खाजगी दवाखाने असून, येथे अँब्युलन्सचा मोठा वावर आहे. या खांबांमुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिक नागरिकांनी आणि व्यावसायिकांनी महावितरणला वारंवार मौखिक तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.यामुळे राज्य पातळी मानवी हक्क संरक्षक एम. व्ही. बनसोड यांनी दिनांक १७ मार्च २०२५ रोजी भंडारा शहर पोलीस निरीक्षकांना निवेदन दिले. तसेच, आज दिनांक २० मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य महावितरणच्या मुख्य कार्यालयाला अधिकृत पत्र पाठवले आहे. या पत्रात भंडारा महावितरणला ७ दिवसांत हे खांब हटविण्याची आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असताना, महावितरण मात्र केवळ बिल वसुलीमध्ये मग्न आहे. आता हा प्रश्न सुटतो की अजून किती दिवस लोकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागणार? प्रशासन आणि महावितरण या गंभीर समस्येकडे लक्ष देतील का, हा प्रश्न आहे!




## कला महाविद्यालय बिडकीन येथे स्नेहसंमेलन व वार्षिक बक्षीस वितरण समारंभ साजरा




**बिडकीन :** एकता शिक्षण प्रसारक मंडळाचे कला महाविद्यालय बिडकीन ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ दिनांक १९ मार्च २०२५ रोजी सांस्कृतिक विभागाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सचिन शिंदे पाटील समन्वयक परम स्किल सेंटर छत्रपती संभाजीनगर व प्रमुख उपस्थिती डॉ. युसुफ पठाण कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन आहेर यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. मिलिंद ठोकळे यांनी केले त्यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठीचे विविध कार्यक्रम , राबवलेल्या कल्याणकारी योजना व महाविद्यालयाने विद्यापीठ अंतर्गत व आंतर विद्यापीठ अंतर्गत केलेल्या कामगिरीची माहिती दिली . तसेच प्राध्यापकांनी त्यांच्या कर्तुत्वाने त्यांना मिळालेले पुरस्कार यातूनच विद्यार्थ्यांनी प्रेरणा मिळते असे प्रतिपादन केले. यानंतर प्रमुख पाहुणे सचिन शिंदे पाटील यांनी महाविद्यालयातील स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यातील संधी आहे.

महाविद्यालयात विद्यार्थी आपल्या करिअरची सुरुवात करतात महाविद्यालयांमधून कवी, लेखक, दिग्दर्शक, निर्माता, पत्रकार, हिरो ,हिरॉईन, नाटकार, कलाकार, त्याचबरोबर चांगले खेळाडू घडवण्याचे हे एकमेव केंद्र म्हणजे महाविद्यालय असते असे सांगितले कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नितीन आहेर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त करून विद्यार्थ्यांचे यश म्हणजे प्राध्यापकांनी केलेल्या कामाची पोचपावती आहे व विद्यार्थ्यांच्या यशातूनच महाविद्यालयाचे नाव मोठे होते म्हणून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयमधे शिकत असताना आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी कोणत्याही प्रकारचा मनामध्ये न्यूनगंड न बाळगता आपल्या सप्तगुणांना वाव दिला पाहिजे असे मनोगत व्यक्त केले.

यानंतर महाविद्यालयामध्ये विविध गुणदर्शन कार्यक्रम, कवी संमेलन , प्रश्नमंजुषा , शेलापागोटे , एकांकिका, भारुड, गोंधळ अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

यानंतर बक्षीस वितरण समारंभ घेण्यात आला यामध्ये महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातून प्रथम, द्वितीय ,तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर अंतर्गत जानेवारी २०२५ मधे सालाबादप्रमाणे युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते या युवा महोत्सवांमध्ये कला महाविद्यालय बिडकीन या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजुषा या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल त्यांना सन्मानचिन्ह आणि विद्यापीठाने दिलेले प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यामध्ये गणेश नाईक, आदेश गायकवाड, योगेश शिंदे आणि स्वाती शिरवत या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख व संघप्रमुख प्रा. मिलिंद ठोकळे, महिला संघप्रमुख डॉ. अर्चना काटकर डॉ. शेख मुखत्यार, डॉ. वैशाली पेरके यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ . शेख मुखत्यार यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि शेर शायरीने मुलांना खेळवत ठेवले आणि संपूर्ण वातावरण आनंदीमय झाले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मोहसीन शेख ,डॉ. रमेश गायकवाड ,डॉ. मुजीब सय्यद, डॉ. प्रसाद करंदीकर, डॉ. रामकिसन मुंडे सर प्रशासकीय कर्मचारी नरहरी उबाळे, संभाजीराव आंधळे, अण्णासाहेब थिटे, शेख कयूम त्यांनी अतिशय मेहनत घेतली या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ग्रंथपाल डॉ. अंजली काळे यांनी केले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागातर्फे जागतिक वन दिवस साजरा



**उमरगा :** वनसंवर्धन ही केवळ पर्यावरण संरक्षणाची बाब नाही, तर ती मानवजातीच्या अस्तित्वाची गरज आहे. प्रत्येकाने वृक्षारोपण करणे, अवैध वृक्षतोड थांबवणे, पुनर्रोपण उपक्रमात सहभागी होणे आणि पर्यावरण संवर्धनासाठी योगदान देणे आवश्यक आहे. “वन वाचवा, जीवन वाचवा” हा संदेश डॉ. संजय अस्वले यांनी जागतिक वन दिवस स्वच्छता मोहिमेच्या उद्घाटन प्रसंगी दिला.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे वनस्पतीशास्त्र विभागातर्फे जागतिक वन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. जलसंवर्धन, वनसंवर्धन आणि पर्यावरणीय जागरूकतेचा संदेश देण्यासाठी विविध कृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परिसर, उद्यान स्वच्छता आणि तण निर्मूलन कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते स्वच्छता मोहिमेची सुरुवात करून झाली.

त्यांनी आपल्या भाषणात जंगल संवर्धनाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.यावेळी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनोद देवरकर यांनी जलसंवर्धन, जैवविविधता, हवामान बदल आणि वनीकरणाच्या गरजेवर सखोल प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी वनस्पतींच्या संरक्षणासाठी संकल्प केला.वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सेंद्रिय खतनिर्मिती आणि औषधी वनस्पतींच्या उपयोगावर परिचर्चा केली.

कार्यक्रमाचे संयोजन डॉ. आशा शिंदे यांनीकेले तर डॉ. पार्वती सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी श्री बालाजी शिंदे, श्री विनायक जाधव, श्री हरिभाऊ देशमुख आदी उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ मार्च २०२५

# श्रद्धेय मा. बाळासाहेब आंबेडकर यांना प्रवर्तन पत्र

श्रद्धेय मा.बाळासाहेब, प्रवर्तन जयभीम !आपणास पत्र लिहितांना मनात थोडीशी आदरयुक्त भीतीच आहे. तरीही हे खुले प्रवर्तनपत्र लिहिण्याचं धाडस करतोय.आपण समजून घ्याल त्यावर चिंतन कराल ही अपेक्षा.बाळासाहेब, तुम्ही पृथ्वीवरील समग्र मानवाच्या, देशाच्या प्रज्ञासूर्याचे नातू आहात. त्यामुळे मला तुमच्याबद्दल आभाळाएवढाच आदर आहे. आणि मोठं कुतूहलही आहे. कारण काय, तर बाबासाहेबांचं भारतीयांशी जगावेगळं नातं आहे. ते सर्व भारतीयांच्या बापाच्या बपाचेही बाप आहेत. म्हणून राजगृहातल्या प्रत्येकाला आमच्या कातडीचे जोडे करून घालायला दिले, तरीही भारतीय वंचित-बहुजनांवरचे त्यांचे ऋण फिटणार नाहीत. सूर्य, चंद्र, तारे असेपर्यंत आम्ही बाबासाहेबांच्या विचाराचे ‘नवनीत’ होऊनच काम करू. त्यांच्यापासून आम्हाला भरकटवण्याचा, तोडण्याचा कुणीही-कितीही प्रयत्न केला तरी, आम्ही आंबेडकर घराण्यासाठी निष्ठापूर्वक काम करू. कधीही बेईमानी करणार नाही. तो गुन्हा आमच्या हातून कधी घडणारही नाही.बाळासाहेब, आपण बाबासाहेबांच्या विचारानुरूप वर्तन करत आहात, त्यांचा राजकीय विचार पुढे घेऊन जात आहात. याचा आम्हाला खुपच अभिमान वाटतो. वंचित बहुजनांसाठी निष्ठापूर्वक लढत आहात. हे आमचे सौभाग्यच आहे ! आरक्षण विषयक असलेली तुमची राजकीय समज, भूमिका खरोखरच वंदनीय आहे. त्या संदर्भात नांदेडच्या प्राध्यापकांविषयी तीव्र नाराजी व्यक्त केलेला तुमचा एक व्हिडिओ सर्वत्र व्हायरल होत आहे. सर्वच व्हाट्सअप ग्रुप वर तो फिरत आहे. त्याविषयी तुमच्याशी हितगुज करावं. तुमचं अभिनंदन करावं. एवढाच हेतू या प्रवर्तनपत्रा पाठीमागे आहे. तुम्ही जाहिर सभेत उद्विग्न होऊन जे बोललात ना, त्याचं मी मनापासून स्वागतच करतो. आणि तुमचं अभिनंदनही करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतर आम्हाला इतक्या हक्कांनं व अधिकाऱानं समजावून सांगणारं नेतृत्व नव्हतंच. आज तुमच्या रूपानं ते मिळालं याचा अभिमान आणि आनंद वाटतो. बाळासाहेब, २०१९ च्या नांदेड लोकसभा निवडणुकीत तुम्ही एका प्राध्यापक मित्राला उतरवलं. अन् आमचा आनंद गगणात मावेनासा झाला. त्यावेळी प्राध्यापकांचा सन्मान करणारे तुम्ही एकमेव नेते होता. म्हणून आम्ही तुमच्या निर्णयासोबत, मेंदू नसलेलं डोकं घेऊन, मत, वेळ आणि पैसा याची तमा बाळगली नाही. तुमच्या सन्मानार्थ दिवस-रात्र एक केला. भोळ्या-भाबड्या,भावनिक आंबेडकरानुयायांनी तर त्यावर्षी बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी न् करता, जमलेला सर्व पैसा, वंचित-बहुजनांचं ‘नवनीत’ डोक्यात घेऊन, तुमच्या चरणावर अर्पण केला. एका ‘नालायक’ धोकेबाज प्राध्यापकाला, तुम्ही आमच्या डोक्यावर बसवलं, नाचवलं. आम्ही हुं की चुं केलं नाही. तुमचा निर्णय आदेश समजून त्यावेळी सर्वश्रेष्ठ मानला. आम्ही आमचा मेंदू वापरलाच नाही. बाळासाहेब, त्यावेळीचा तुमचा निर्णय आमच्यासाठी प्रमाण होता. आम्ही फक्त वंचित-बहुजनाचंच ‘नवनीत’ डोक्यात ठेवलं. तेच वापरलं. त्याचीच कॉपी केली. त्या नालायकाने मात्र, तुमचा निर्णय भोसड्यात घातला. अशा प्राध्यापकांबद्दल तुमच्या तोंडून निघालेले ‘उद्गार’ हे स्वाभाविकच आहेत. मी व्यक्तीशः तुमच्या मताशी सहमत आहे. पण बाळासाहेब, खरं सांगू आज कालच्या राजकीय पुढाऱ्यांना,मेंदू असलेले प्राध्यापक नकोच आहेत ! आपल्या पक्षाचे ‘नवनीत’ वापरून, आम्ही सांगतो तेच काम त्यानी उत्तम पध्दतीने केले पाहिजे आणि नांगराचे बैल बनले पाहिजेत, असे महार पुढाऱ्यांना वाटते. पण तुम्ही त्याला फाटा देऊन, प्राध्यापकांचा सन्मानच केलात. तुमच्या थिंक टँक मध्ये त्यांना मोठी संधी दिलीत. पण त्यांना ही जबाबदारी सक्षमपणे पेलवता आली नाही. त्यामुळे तुम्ही अशा नालायकांची, मेंदू नसलेली डोकी सडकून काढलात, ते एका अर्थाने बरेच झाले ! सुरुवातीला तो व्हिडिओ ऐकल्यावर, माझ्या काळजात थोडं चर्रर्रर्रच झालं होतं. पण नंतर तुमच्याबद्दलचा आदर द्विगुणित झाला. बाळासाहेब, जे लोक नालायक आहेत, ते ! तुम्ही जो ‘अस्सल’ शब्द वापरलात तसे जे आहेत, ते आहेतच ! संस्था चालकांना लाखो रुपयांचे डोनेशन देऊन, आरक्षणाचा आनादर करणारे जे लाभार्थी आहेत, ते आहेतच ! पण बाळासाहेब, डोळ्यांना झापड लावून चालणारे, बाबासाहेबांच्या विचारांशी द्रोह करणारे रिपब्लिकन नेते, असोत की प्राध्यापक ! त्यांचे हाल कुत्रे खाणार नाहीत, ही काळ्या दगडावरची लखेर आहे. संविधानाशी द्रोह करून पोट भरणारे ‘पोटभरे’ भिंगे, पाडाळकर, कांबळे, शेळके इत्यादी प्राध्यापक नालायक असू शकतात. पण तुमच्या स्वतःच्या घरात डॉ.अंजलीताई प्राध्यापिका आहेत. त्यांनी तुमचं कुटूंब सांभाळलं, तुमचं नेतृत्व विकसित केलं, त्याला बळ दिलं, ते वाढवलं. हे तुम्हाला चांगलंच ज्ञात आहे. म्हणून तुम्ही उगीच, अविचाराने प्राध्यापकांवर रागावणार नाही, याची मला खात्री होतीच. घरातला राग तुम्ही बाहेर काढणार नाही. त्या पाठीमागे काहीतरी गंभीर कारण असले पाहिजे. त्या शिवाय तुम्ही असं बोलणार नाही. हे माझ्या लवकर लक्षातच आलं नाही ! बाळासाहेब, आजकाल राजकीय पटलावर इतके बदल होत आहेत, की आपले राजकीय पुढारी कधी कोणत्या पक्षात जातील? कोणाबरोबर युती करतील, कधी करोडो रुपये घेऊन, कोणाच्या बाजूने उभे राहतील, निष्ठावान कार्यकर्त्यांचा कधी गळा कापतील हे कुणालाच कळू शकले नाही. नागरिकांना कधी भावनिक करतील अन् त्यांना कधी धोका देतील. हे ‘थिंक टैंक’ च्या बापालाही कळणार नाही. सांगा साहेब कसा विश्वास ठेवायचा कुणावर! प्राध्यापक ‘नालायक’ झाले आणि राजकीय पुढारी निर्लज्ज ! ‘आज इथं तर उद्या तिथं’ अशी यांची अवस्था झालेली आहे. अशा परिस्थितीत कुणालाही फ्रस्ट्रेशन येतंच ना, त्याला कुणीही अपवाद असू शकत नाही.काय सांगायचं बाळासाहेब, आज कालच्या प्राध्यापकांना तर भूमिकाच राहिल्या नाहीत. तुम्ही म्हटल्यासारखं यांच्या डोक्यात मेंदूच नाही, ‘नवनीत’ डोक्यात घेऊन हे फक्त आरक्षणाचे लाभार्थी बनले आहेत. रिपब्लिकन‘महार’ पुढाऱ्यांचेही बाळासाहेब, असेच झाले आहे. एकदा त्यांचेही तुम्ही डोके सडकून काढा. आता त्यांच्या डोक्यात तर कुठे मेंदू राहिलाय? ते ही साले कुठल्याही पक्षाचे ‘नवनीत’ हाती घेऊन, संसदेत डरकाळी फोडण्याऐवजी शेपूट घालतात नि फक्त कुत्र्यांसारखे विव्हळतात. यांचा सिंह, कुत्रा कधी झाला हे कुणालाच कळले नाही. यांनी तरी कुठे बाबासाहेबांची लाज राखली आहे? यांना तरी कुठे आरक्षणाशिवाय काय करता आले? स्वतःच्या बळावर यांनी तरी कधी काय उभं केलंय? बाबासाहेबांच्या नावानं तेही ‘जोगवा’च तर मागत राहिले!चळवळ कायम टिकावी म्हणून इतक्या वर्षात युवकांचे संघटन तरी यांनी उभं केलं का? किमान महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडे तरी यांचं लक्ष आहे का? सांगा बाळासाहेब, ही चळवळ उद्या कुणाच्या खांद्यावर स्थिरावणार आहे? हा विचार तरी कुणाच्या डोक्यात आज येतोय का..? हा प्रश्नच गंभीर आहे! याची चाड कुणालाच राहीली नाही. ज्याला-त्याला आपलीच लाल करायची आहे. बाबासाहेबांनी उभारलेले स्वावलंबी रिपब्लिकन आंदोलन, आपल्यापासून कोसो दूर गेलेय, याबद्दल कुणालाच चिंता वाटत नाही. ज्याला-त्याला दुसराच गुन्हेगार वाटतोय. स्वतःमध्ये डोकावण्याची, आरशात पाहण्याची हिंमतच कुणी करत नाही. भारताला ‘अखंड’ आणि ‘लोकांचा’ देश बनवणारे रिपब्लिकन आंदोलन, परावलंबी बनवण्यामध्ये कुणाचा हात आहे? ही जबादारी आज कुणी स्वीकारेल का..? ज्याला-त्याला स्वतःच्या पोटा इतके आणि मेंदूच्या आकारा इतकेच बाबासाहेब हवे आहेत.बाळासाहेब, यावर तुम्ही गंभीरपणे बोललं पाहिजे. या संदर्भानं सकारामत्मक पावलंही तुम्हीच उचलली पाहिजेत. तरच ‘सामाजिक लोकशाही’ आणि वंचित-बहुजनांचं अस्तित्व टिकून राहील. आणि संसदेचे बंद दरवाजे सर्व नागरीकांसाठी उघडतील.‘राजगृह’ हा आमच्या श्रद्धेचा विषय आहे. बाळासाहेब, आम्ही त्याला आमचं देशातील सर्वोच्च सभागृह आणि न्यायालयही मानतो. कारण संविधानाची काही पानं इथेच लिहिली गेली आहेत. ते स्थान आमच्यासाठी पवित्र राष्ट्रीय स्मारक आहे. त्यामुळे ‘राजगृह’ हे आम्हाला कधीही संसदेपेक्षा कमी वाटले नाही. परंतू बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या राजकीय आरक्षणाचा फायदा उचलत नालायक पुढाऱ्यांनी ‘राजगृहा’कडे कमालीचे दुर्लक्ष केले. त्याचे पावित्र्य जपले नाही. याची खंतही वाटते. राष्ट्रनिर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक विचार आहेत. बाळासाहेब, त्यांच्या राष्ट्रीय रिपब्लिकन आंदोलनामुळेच, अखंड, लोकसत्ताक राष्ट्राची निर्मिती झाली. वैदिक व्यवस्थेच्या कुजकट वर्चस्वाखाली भारतीय समाज शेकडो वर्ष खितपत पडलेला होता. बाबासाहेबांनी जर कुढत पडलेल्या या भारतीय प्रजेला, नागरिकत्व बहाल केले नसते, तर त्यांची गुलामी संपवायला, कोणता राष्ट्रीय नेता येणार होता..? कुठल्या देवळातला देव येणार होता..? देव आणि देवळांच्या दलालांनीच तर भारतीयांशी गद्दारी करुन, त्यांचे मनुष्यत्व हिरावून घेतले होते. बाबासाहेबांमुळे सर्वांनाच माणूस बनण्याची संधी मिळाली. परंतू ‘आरक्षण’ आणि ‘भारतीयत्व’ हे काही नालायक ‘महार’ पुढारी आणि प्राध्यापक यांच्या पर्यंतच सिमित राहीले पाहिजे, असा गैरसमज तडजोडवादी, भिकारचोट, राजकीय लाभ उठवणाऱ्या पोटार्थी पुढाऱ्यांकडून पसरवला जात आहे. त्यासाठी महान विद्वान प्राध्यापकांनीच स्वतःचा पहिला बळी दिला पाहिजे. असा निर्बुद्ध विचार काही भामट्या पुढाऱ्यांनी पसरवला. क्षमता असलेल्या प्रबुद्ध कर्मचाऱ्यांनी, राजकीय क्षेत्रात कामच करू नये. कर्मचाऱ्यांनी दोन्हीकडचे लाभ घेऊ नयेत, प्राध्यापकांनी आपला पगार उचलून, तो नालायक राजकीय पुढाऱ्यांवर, नशेबाज कार्यकर्त्यांवर खर्च करावा, असे राजकीय क्षेत्रातील पुढाऱ्यांना वाटते. हे कसे शक्य आहे बाळासाहेब..! आंबेडकरी चळवळीत चुका सर्वांनीच केल्या आहेत मग शिक्षा फक्त प्राध्यापकांनाच कशासाठी..? रिपब्लिकन भूमिकेचे राजकारण टिकवण्यासाठी ते वाढवण्यासाठी, पहिल्यांदा कर्मचाऱ्यांनीच तर मोठे योगदान दिले आहे. कार्यकर्त्यांच्या आणि पुढाऱ्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था पहिल्यांदा त्यांनीच तर केली आहे.खरं सांगू बाळासाहेब, आकाशातील सर्व ग्रहांना प्रकाशमान करणारा सूर्य आणि पृथ्वीवरील माणसांना प्रबुद्ध बनवणारा प्रज्ञासूर्य यांची रीत, कृती आणि व्यापकता सारखीच आहे. आकाशातील सुर्यामुळे गृह, तारे जसे प्रकाशमान होतात. तसेच पृथ्वीवरील सर्व मानवप्राणी बाबासाहेब नावाच्या प्रज्ञासूर्यामुळे बुद्धिमान होत आहेत. हे वास्तव आनेकांना बोचत आहे. परंतू प्रज्ञासूर्याचा ‘प्रकाश’ फक्त पुर्वसूरीच्या महारांवर व ‘राजगृहा’वरच पडला पाहिजे. असा प्रयत्न करणे म्हणजे मूर्खांच्या नंदनवनात वावरण्यासारखे आहे.हे आपल्या नालायकपणाचे व नाकर्तेपणाचे लक्षण आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आता केवळ एका समाजाचे किंवा कुणा एका व्यक्तीचे नातेवाईक राहिले नाहीत. तर तो मानवी बुद्धीच्या कक्षा रुंदवणारा, एक बलाढ्य विचार बनलेला आहे. हा विचार कधी ना कधी माणूस नावाच्या प्राण्यापर्यंत पोहोचणार आणि लबाडाचे सोंग उघडे पडणार हे त्रिकालबाधित सत्य आहे. काळे ढग जसे सूर्याला काही क्षणच आडवू शकतात. तसे डॉ.बाबासाहेब आंबेडकर नावाच्या प्रज्ञासूर्याच्या विचारांचा प्रकाश, संघाचे काळे ढग क्षणभरच रोखू शकतात. त्यामुळे आपल्यासारख्यांनी या संघाच्या काळ्या ढगांना सावली समजून त्याखाली सुरक्षित असल्याची चूक करू नये, अन्यथा अशा गुन्ह्याला काळच माफ करणार नाही. प्रसंगी काळ्या ढगांना घाबरून जाण्याची, उद्विग्न होण्याची काहीच आवश्यकता नाही. पूर्वाश्रमीच्या ‘महार’ नेतृत्वाला स्वतःचे अस्तित्व धोक्यात आले आणि विरोधकांच्या वळचणीला बसून दात रंगले की, यांना उगीच वाटते की, आता सर्व संपले. जग बुडाले. दलित चळवळ संपली. आंबेडकरवादी चळवळ संपली..! पण तसे नाही, खरं तर विचार कधी संपत नसतो. तो पाण्याच्या प्रवाहासारखा अखंड वाहत असतो. त्याला रोखता येत नाही. प्रज्ञासूर्याचा विचारही, असाच आहे. दृष्टीहीन नेत्यापासून तो दूर गेल्यामुळे व यांच्या हातून निसटल्यामुळे यांना उगीच असे वाटते की चळवळ संपली. पण आपण एक लक्षात ठेवूया, ६ डिसेंबर १९५६ ला बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण होईपर्यंतच ते ‘राजगृहा’चे व महार समाजाचे नातेवाईक होते. त्यानंतर ते देशाचे आणि पृथ्वीवरील समग्र मानवाचे विचारसूत्र बनले. देशापुरताच विचार करायचा झाला, तर ते सर्व भारतीय नागरिकांचे प्रेरणास्थान, मुक्तिदाते, जीवनगुरु, प्रज्ञासूर्य ठरले आहेत. आयुष्यभराच्या अपयशाने उद्विग्न झालेल्या कोण्या एका राजकीय पुढाऱ्यांचे, किंवा एका जातीचे राहिले नाहीत. बाबासाहेबांनी दिलेले‘आरक्षण’भारतीय वंचित-बहुजनसाठी एक ‘संधी’ आहे. ती कुणा एकाची ‘मक्तेदारी’ होऊ शकत नाही. संधीसाठी लढलं पाहिजे. वैचारिक मंथन केलं पाहिजे. कदाचित ही व्यापक भूमिकाच, बाळासाहेब तुमच्या उद्विग्नतेच्या पाठीमागे असावी असे मला वाटते. ‘संधी’ला ‘मक्तेदारी’ समजून आरक्षण प्रत्येकालाच मिळालं पाहिजे, असा आग्रह धरणारे किंवा आम्हालाही ‘आरक्षण’ मिळालेच पाहिजे, म्हणून सुडभावनेने सत्तेचा गैरवापर करणारे जातसमूह आलीकडे बेताल झालेले आहेत. हे आपण पाहत आहोत. अशा अराजकतेच्या काळात आरक्षणावर गांभीर्याने विचारमंथन करण्याची खरोखरच आवश्यकता आहे. बाळासाहेब, हे केवळ तुमच्याच लक्षात आले असावे, म्हणूनच आपण प्राध्यापकांविषयी आपले मत कठोर शब्दात मांडले. हे आम्ही समजू शकतो. पण तुम्ही असे नाराज होऊन, उद्विग्न होऊन चालणार नाही. बाळासाहेब, समाजाला तुमची खूप गरज आहे. राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुनर्स्थापित केलेली भारतीय लोकशाही, तिला सर्मपित असणारी, संसद आणि संविधान लोकरक्षणासाठी टिकणे आवश्यक आहे. या राष्ट्रीय मूल्यांना एका समाज घटकासाठी किंवा एखाद्या घराण्यासाठी वापरणे कृतघ्नपणाचे ठरेल. बाळासाहेब, महाराष्ट्रातील वंचित-बहुजन लोक फारच श्रद्धेने, आपुलकीने आपल्याकडे डोळे लावून बसले आहेत. ते तुम्हालाच चळवळीचे ‘नवनीत’ मानतात. स्वतःचं डोकं न चालवता, तुमचे ‘नवनीत’ घेऊन जगण्याचा आग्रह धरताहेत. म्हणूनच आजच्या या परिस्थितीवर प्रत्येकाने स्वपरिक्षण करण्याची आवश्यकता आहे, असे मला व्यक्तिशः वाटते. जे समाजघटक आणि कार्यकर्ते तुम्हाला वंचित-बहुजनांचे मसीहा समजतात. त्यांना आपण काय दिलं..? सामाजिक मूल्यांना प्रस्थापित करण्यासाठी आणि वंचित-बहुजनाना न्याय देण्यासाठी, राज्याच्या व देशाच्या सभागृहात जाऊन लढू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना आपण काय दिलं..? प्रगाढ बुद्धिमत्ता, अक्षम्य निर्णय क्षमता, प्रस्थापित राजकीय व्यवस्थेला धक्के देण्याची हिंमत फक्त तुमच्याकडे आहे. असे असताना तुमच्यावर जीवापाड निष्ठा ठेवणाऱ्या वंचित बहुजन कार्यकर्त्यांना काय मिळाले..? हेही एकदा आपण स्पष्टपणे बोलले पाहिजे. बाळासाहेब तुम्ही बाबासाहेबांचे नातू आहात. समाजाला रागवण्याचा अधिकारही तुम्हाला आहे. बाबासाहेबांनी देखील वेळोवेळी अनेकांना रागावलेलं होतं. ‘पडे लिखें लोगों ने मुझे धोंखा दिया।’ या आशियाने ते कर्मचाऱ्यांवर भडकलेही होते. परंतु त्या रागवण्यातही एक प्रेम होतं, अधिकार होता. तुमच्या रागावण्यात तो अधिकार, ते प्रेम कुठेच जाणवले नाही. त्यातून केवळ आणि केवळ मत्सर, द्वेष, अहंकार ओसंडून वाहत होता. बाबासाहेबांच्या त्या प्रेमळ रागावण्यांमुळे मान्यवर कांशीराम यांच्यासारखे राष्ट्रीय नेते जन्माला आले. बामसेफ, बीएसपी सारखे राष्ट्रव्यापी संघटन निर्माण झाले. प्रस्थापितांना हादरे देणारे इतिहासकार, साहित्यिक, विचारवंत, अभ्यासक जन्माला आले. आज कालच्या ‘नालायक’ ‘भोसडी’च्या दृष्टीहीन लाभार्थ्यांवर भडकवून काय निर्माण होणार आहे..? ‘वाळूत मुतलं फेस ना पाणी’ अशी भ्रष्ट आंबेडकरानुयायांची स्थिती आहे. बाळासाहेब, तुमच्या ‘थिंक टँक’ मध्ये नेमके कोण आहेत. त्यांना आंबेडकरवादी राजकीय चळवळ कुठे घेऊन जायची आहे..? त्यांची व्यथा काय..? त्यांची ‘रणनीती’ काय..? त्यांच्याकडे कार्यक्रम कोणता आहे..? त्यांचे सोर्स ऑफ रिसोर्स काय आहेत..? हे माझ्यासारख्या प्राध्यापकाला कळणे कठीण आहे. परंतु आजपर्यंत देशभरातल्या प्राध्यापक व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी, बाबासाहेबांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी डीएसफोर, बामसेफ, बीएसपी, बहुजन महासंघ, रिपब्लिकन पक्ष इत्यादी सामाजिक, राजकीय, वैचारिक संघटन उभे करण्यासाठी आर्थिक, बौद्धिक, शारीरिक, परिश्रम केले आहेत. त्यांनीच नेतृत्वाला बळ दिले आहे. नेतृत्व निर्माण केले आहे. चुकीचे नेतृत्व गारदही केले आहे. राजकीय आरक्षण लाटून आमदार, खासदार बनलेल्या समाजद्रोही आणि आंबेडकरद्रोही, रिपब्लिकन नेत्यांच्या पाठीशीही तेच सर्वजन उभे राहीले आहेत. देशाच्या सर्वोच्च सभागृहात जाऊन, डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या आरक्षणामुळे खासदार बनून, रिपब्लिकन पुढाऱ्यांनी तर काय दिवे लावले..? बाळासाहेब, बाबासाहेबांची चळवळ रसातळाला घेऊन जाणारा, समाजातला प्रत्येक समाजघटक जबाबदार आहे. बाबासाहेबांच्या नावावर जोगवा मागून जगणारा प्रत्येक समाजघटक ढोंगी आणि बेईमान आहे. प्रत्येकाच्याच अस्तित्वावर बाबासाहेबांची सही आहे. मग एकाच घटकावर आरोप ठेवून आपण काय सिद्ध करणार आहात बाळासाहेब! ‘प्राध्यापकांच्या डोक्यात ‘मेंदू’ नाही तर ‘नवनीत’ आहे’ हा तुम्ही केलेला केवळ आरोप नाही, ते सामाजिक वास्तवही आहे. प्राध्यापकांच्या डोक्यात खरोखरच मेंदू असता तर ते संस्थाचालकांचे ‘सालगडी’ बनण्याऐवजी ‘महार’ ‘दलित’ आणि प्रस्थापित राजकीय व्यवस्थेला आतून मदत करणाऱ्या, विकाऊ रिपब्लिकन पुढाऱ्यांचे,व दळभद्री नेतृत्वाचे वेळीच डोके सडकवून काढू शकले असते. आणि बाबासाहेबांच्या ऋणातून वेळीच मुक्त झाले असते. भ्रष्ट आणि निर्बुद्ध राजकीय पुढाऱ्यांचे, ‘नवनीत’ डोक्यात ठेऊन निर्लज्जपणे वापरले नसते. बाळासाहेब, बाबासाहेबांचे आमच्यावर खरोखरच आभाळाएवढे ऋण आहेत हो! आमच्या कातडीचे जोडे करून तुमच्या पायात घातले ना, तरीही ते ऋण फिटणार नाहीत. खरोखरच त्यांनी ‘आरक्षणा’ची संधी दिली नसती तर आम्हाला प्राध्यापक, आपल्याला खासदार, आमदार आणि वेगवेगळ्या सभागृहामध्ये प्रतिनिधित्व करता आले नसते. पण याचे भान आहे कुणाला..? प्रत्येकजण एकमेकांच्याकडे बोट दाखवतो आहे. ‘माझीच लाल’ म्हणा! असा त्यांचा अटीट्युड आहे. यामुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रात आम्ही पुढे जाऊ शकलो नाही. स्वतःच्या हिंमतीवर खरोखरच काही करू शकलो नाही. याची लाज कुणा एकट्याला वाटून चालणार नाही, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव घेणाऱ्या प्रत्येकालाच ती वाटली पाहिजे. आंबेडकरद्रोह प्रत्येकानेच केलेला आहे..! त्यामुळे बाबासाहेबांच्या नावावर जगणाऱ्यांनी, नैतिकतेचा भाग म्हणून पुढाऱ्यांनीही राजकारण सोडले पाहिजे. आणि थोडीशी लाज शिल्लक असेल तर प्राध्यापकांनीही नोकरीचा राजीनामा दिला पाहिजे. ही वेळ प्रत्येकावर आज ना उद्या येणार आहे. गुन्हेगारांना शिक्षा मिळणारच आहे. आता हळूहळू नवी पिढी जागृत होत आहे. बाळासाहेब, तुमच्यावर खूप मोठी जबाबदारी आहे. आज तुमच्याकडे बघून, तुमचे उद्विग्नतेने गदगदलेली भाषणं ऐकूण, आमच्या प्रज्ञासूर्याची, आज तिव्रतेने आठवण होतेय. त्यांच्या पोटी आमच्यासारख्या करंट्यांचा जन्म कसा काय होऊ शकला, याचे आश्चर्यच वाटते. असा राष्ट्रीय नेता, सर्वांच्या बापाचा बाप पुन्हा होणे नाही..! वैदिकांच्या वर्चस्वाखाली वावरणाऱ्या हिंदूंनी, त्यांच्यावर व्यक्तिशः अतोनात अन्याय-अत्याचार केले. त्यांचा अमानवी छळ केला. वेळोवेळी अपमानही केला. तरीही त्यांच्याच सन्मानाचा, स्वावलंबनाचा, स्वाभिमानाचा, त्यांच्या मूलभूत हक्काचा, अधिकाराचा, मुक्तीलढा बाबासाहेबांनीच लढला. त्यांचा बदला घेतला नाही. सुडाच्या भावनेने कोणतेच कार्य केले नाही. भारतीय नागरिक आणि राष्ट्राचा सन्मान व अखंडता हेच त्यांचे जीवन होते. ‘मी आधी भारतीय आहे’ हे ब्रीदवाक्य म्हणजे त्यांची अथांग राष्ट्रनिष्ठा होती. ते कुठल्याच एका समाजघटकावर, देशबांधावर तुटून पडले नाहीत. राष्ट्राचे पुनर्निर्माण हाच त्यांचा ध्यास होता. बाळासाहेब, आपण राष्ट्रनिर्माते आणि प्रज्ञासूर्य असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आहात, याचा आम्हाला खूप अभिमान वाटतो. आणि आदरही वाटतो. बाबासाहेबांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी समाज अजूनही ‘राजगृहा’चा तिथकाच सन्मान करतो. तुम्ही म्हाणालात ‘तुमचं डोकं चालवू नका. तुमच्या डोक्यात मेंदू नाही तर ‘नवनीत’ बसलेला आहे’ ते खरंय बाळासाहेब, खरोखरच ‘बाबासाहेब’ आणि ‘आरक्षण’ नसतं तर तुमचं-आमचं काय झालं असतं..? कोण ओळखलं असतं आपल्याला. कोण सन्मान केला असता आपला..? ‘फुकटचं मिळालं आणि कर्तृत्वानं घालवलं’ अशी आपली ओळख..! आपण सर्वचजणं परावलंबी..! प्रज्ञासूर्याच्या नावावर, उर्जेवर जगणारे उपद्रवी माणसं..! आम्हा प्राध्यापकांना तुमची तळमळ कळते बाळासाहेब..!आपण आजवर आरक्षणाकडे संधी म्हणूनच बघायला हवं होतं.कुणा एकाची जहागिरी म्हणून नव्हे! ते आज ना उद्या संपुष्टात येणारच आहे.जात संपली की आरक्षणही संपेल. तोपर्यंत तर ‘जिसकी लाठीं उसकीं भैंस’ हे घडतच राहील. रिपब्लिकन नेते आणि प्राध्यापक दोघेही आरक्षणाचे फक्त लाभार्थी आहेत. आजवर यालाच ते मोठा लढा समजत आले आहेत. त्यातूनच ‘पे बॅक टू सोसायटी’ ही उदात्त जाणीव, संवेदना, संकल्पना जन्माला आली. बाबासाहेबांच्या विचारांना प्रमाण मानणाऱ्या कर्मचाऱ्यांनी ही ‘संकल्पना’ मोठ्या निष्ठेने राबवली. बावीस प्रकारचे टॅक्स भरता-भरता, कण्हत कुथत का होत नाही, ‘पे बॅक टू सोसायटी’ची जबाबदारी भारतातल्या कर्मचाऱ्यांनी पार पाडली. आरक्षणाचा लाभार्थी फक्त कर्मचारी नाही राजकीय पुढारी देखील आहेत. परंतु कर्मचाऱ्यांना पगार मिळतो म्हणून बावीस प्रकारचे टॅक्सही त्यांना भरावे लागतात. रिपब्लिकन, बहुजन, पुढारी, कार्यकर्ते आणि इतर प्रासंगिक कार्यक्रमांचे पैसेही त्यालाच द्यावे लागतात. सरकार आणि समाज या चक्कीत तो कायम पिसला जातो. ‘पे बॅक टू सोसायटी’ची जबाबदारी सुरुवातीच्या काळात कर्मचाऱ्यांनीच उचलली. हे वास्तव कुणीच नाकारत नाही. कर्मचाऱ्यांच्या पैशावर स्वावलंबी बनलेल्या राजकीय लाभार्थ्यांना ‘पे बॅक टू सोसायटी’चा नियम लागू होत नाही का...? राजकीय पुढाऱ्यांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक जबाबदारी विषयी बाबासाहेब कधी-काही बोललेच नाहीत का..? भोळ्या-भाबड्या,भावनिक,आंबेडकरांनूयाना निवडणुकीत विकतांना पुढाऱ्यांचे हात थरथरले नाहीत का..? यांच्या काळजात चरर्रर्रर्र झाले नाही का..? देशद्रोही राजकीय पक्षांसोबत आर्थिक वाटाघाटी करणाऱ्या, बेजबाबदार राजकीय पुढाऱ्यांवर कोण बोलणार बाळासाहेब..! तुम्हीच एकदा म्हणाला होतात दलित चळवळ संपली. नेते संपले. मग ही आंबेडकरद्रोही पिलावळ आली कुठून..? अशावेळी प्राध्यापकांनी काय भूमिका घ्यायची..? कुणाच्या पाठीशी उभं राहायचं..? कुणासोबत जायचं..? आम्ही स्वतंत्र काही करण्याचा प्रयत्न केला अथवा एखादी वास्तव भूमिका मांडली, तर पुढारी म्हणतात यांना काही कळत नाही, हे पुस्तकी किडे आहेत. यांच्या डोक्यात मेंदूच नाही. यांना मोर्चे आंदोलनाचा अनुभव नाही. आमच्या विषयी असं बोलून विरोधकांसोबत वाटाघाटी करतात.. बाळासाहेब, विसीतला कार्यकर्ता आता पन्नाशीत गेला. वंचित-बहुजनांना आणखी किती दिवस रस्त्यावर ठेवायचं आहे. हे काय चाललंय बाळासाहेब! आरक्षणामुळे शिकलेल्या पहिल्या पिढीकडे फक्त नोकरी होती. राजकीय संपन्नता नव्हती. म्हणून कर्मचाऱ्यांनी सामाजिक, राजकीय उन्नतीची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. आता प्रत्येक भारतीय नागरिक सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि धार्मिक संधीचा लाभ घेत आहे. राजकीय पुढारीही त्यांच्या क्षेत्रात पारंगत बनले आहेत. त्यांनाही प्रचंड आर्थिक लाभ होत आहेत. तेही आर्थिक दृष्ट्या, राजकीय दृष्ट्या स्वावलंबी झाले आहेत. तरीही प्राध्यापकांकडूनच सर्व अपेक्षा करणे ही गोष्ट केवळ चुकीची नाही तर आंबेडकरद्रोही देखील आहे. बाळासाहेब, आज घडीला देशाची सामाजिक, राजकीय, परिस्थिती लक्षात घेऊन आपण एकमेकांना समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. असे नाही झाले तर अथक परिश्रमाने उभी राहिलेली, भारतीयांची ‘रिपब्लिकन चळवळ’ नष्ट होईल. प्रबुद्धभारत निर्मितीचे आपले स्वप्न धुळीस मिळेल. म्हणून मी आपणास विनंती करतो,की, समजदार लोकांना, बुद्धिवंतांना, राजकीय विचारवंतांना एकत्र करून, पुढे जाण्याचा प्रयत्न करूया. ‘एकला चलो रे’ या भूमिकेमुळे अपयश आणि फक्त अपयशच वाट्याला येणार आहे. हे तुमच्या शिवाय कोण समजून घेईल बाळासाहेब..! यापुढे चांगले-वाईट जे काही घडेल ते तुम्हीच करू शकाल असे मनःपूर्वक वाटते. या प्रसंगी एवढेच...थांबू..?

**आपलाच डॉ.सिद्धोधन,**

**९४२०६७१७५०**

dr.siddhodhankamble85466@gmail.com

**-प्रा.डॉ.सिद्धोधन,**

**बिलोली**

**(लेखक आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार, समीक्षक,विचारवंत आहेत)**